महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अंतर्गत चौकशी चे आदेश

जा.क्र.सानिका/नियमन/वैधानिकचौकशी/प्रिदनास./२०१८
कार्यालय :- सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,
ता. कारंजा (घा.), जि. वर्धा. दि. १६/६/२०१८

वाचा :- मा. जिल्हा विशेष लेखा परीक्षक वर्ग -१ सहकारी संस्था वर्धा.
यांचे पत्र क्र. ११४५/२०१७ दिनांक ११/१२/२०१७

ज्याअर्थी श्री. एल.आय.शेख, उपलेखापरिक्षक, सहकारी संस्था आर्वी यांनी प्रियदर्शनी नागरी सहकारी पत संसथा मर्या. आष्टी. र.नं. १३५२ ता.आष्टी, जि. वर्धा या संस्थेचे सन् २०१६-२०१७ चे वैधानिक लेखापरिक्षण केलेले आहे व या वैधानिक लेखापरिक्षणाचे वेळी निर्देशनास आलेल्या गंभीर दोषांबाबतचा प्रशासकिय विशेष अहवाल त्यांनी सादर केलेला आहे. आणि वरील वाचा नुसार मा. जिल्हा विशेष अहवालावर कायदेशिर कार्यवाही करण्याबाबत सुचित केलेले आहे. त्याअर्थी ह्या विशेष अहवालाच्या चौकशी संबंधात खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यांत येत आहे.

## आदेश

मी आर.आर.यादव, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, कारंजा (घा.), महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ मधील वैधानिक तरतुदीनुसार तसेच महाराष्ट्र शासन सहकार व वस्त्रोद्योग विभाग मंत्रालय, मुंबई यांचे आदेश क्रमांक सी.एस.एल./१४९३/११६२ सी.आर/४७/१५-सी दि. ७ ऑगस्ट, १९९३ अन्वये मला प्राप्त अधिकारानुसार, प्रियदर्शनी नागरी सहकारी पत संस्था मर्या. आष्टी, र.नं. १३५२ चे सन् २०१६-१७ चे विशेष अहवालातील गंभीर दोषांवरील चौकशी करण्याकरीता श्री.एस.डब्ल्यु.कोपुलवार सहकारी अधिकारी श्रेणी-१, आष्टी, यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे.

(आर.आर.यादव)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था,ता. कारंजा (घा.)

प्रति,

१) श्री.एस.डब्ल्यु.कोपुलवार सहकारी अधिकारी श्रेणी-१, तथा प्राधिकृत अधिकारी यांनी चौकशी मुदतीत पुर्ण करुन चौकशी अहवाल त्वरीत या कार्यालयात सादर करावा. (सोबत विशेष अहवालाचे परिशिष्ट जोडलेले आहे.)

प्रतिलिपी माहिती तथा आवश्यक कार्यवाही करीता अग्रेषित

१) व्यवस्थापक/अध्यक्ष, प्रियदर्शनी नागरी सहकारी पत संस्था मर्या. आष्टी र.नं.१३५२ आपणांस सुचित करण्यांत येते की, चौकशी अधिकारी यांना चौकशी करीता आवश्यक दस्तऐवज पुरवावे.

प्रतिलिपी माहिती तथा आवश्यक कार्यवाही करीता अग्रेषित

१) व्यवस्थापक/अध्यक्ष, प्रियदर्शनी नागरी सहकारी पत संस्था मर्या. आष्टी र.नं.१३५२ आपणांस सुचित करण्यांत येते की, चौकशी अधिकारी यांना चौकशी करीता आवश्यक दस्तऐवज पुरवावे.

प्रतिलिपी माहितीस सविनय सादर

१) मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था वर्धा.
२) मा. जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग -१ सहकारी संस्था वर्धा.

सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था,ता. कारंजा (घा.)